**नियमित दिवाणी क्र. १२८/२०१९**
**नि.क्र. ३८ पुढे**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक १— अनिल अंजारा यांचा शपथेवर उलटतपास निशाणी ४३ वरील आदेशाप्रमाणे वादीतर्फे ॲड. श्रीमती मेमन मॅडम यांच्या मार्फत सुरुः—**

२२. माझे शिक्षण बी.ए. अंतिम वर्ष नापास असे झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे परिवारामध्ये मीच एकटा सर्वात जास्त शिकलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे घरातील सर्व शासकिय कामे मी स्वतःच पाहतो. हे म्हणणे खरे आहे की, वयोमानानुसार माझी आई नेहमी आजारी असते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती संदर्भात उच्च न्यायालयामध्ये एक प्रकरण चालु आहे. हे म्हणणे खरे नाही की, उच्च न्यायालयातील प्रकरणातील कामकाज मी एकटाच पाहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी एकटा शिकलेला असल्यामुळे सर्व न्यायालयीन कामकाज मी एकटाच पाहतो व इतर कोणीही त्याच्यामध्ये रस घेत नाही.

२३. हे म्हणणे खरे आहे की, वादींना दोन बहिणी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोघी सासरी नांदतात व अधुनमधुन माहेरी येतात. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या बहिणीं या परदानिशी महिला असल्यामुळे त्या बाहेर येणेजाणे करत नाही. माझे वडील सन २०१५ मध्ये वारले. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील खातीजा बी शेख यांचे भाडेकरी होते.

२४. हे मला माहित नाही की, माझे भावाने इगतपुरीमध्ये दोन जागा खरेदी केल्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सन १९८३ पासुन आजपर्यनत वादींना कोणतेही भाडे दिलेले नाही. मी भाडे दिल्याबाबतच्या पावत्या न्यायालयात दाखल केल्या आहे.

प्रश्नः—मी वादीला प्रत्यक्ष भाडे देवुन वादीकडुन कधीही पावती घेतली नाही.
उत्तरः—प्रकरण न्यायालयात दाखल असल्यामुळे मी दावा मिळकतीचे भाडे न्यायालयात भरतो.

२५. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही मुख्य बाजारपेठेमध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मिळकत रिकामी करण्याचा कोणताही इरादा नसल्यामुळे मी त्याठिकाणी अनाधिकृत बांधकाम करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीपासुन बाजारपेठ, शाळा व रेल्वेस्टेशन जवळ आहे.

२६. आता मला दाखविलेल्या फोटोमध्ये माझी आई आहे. सदर फोटोला अर्टिकल अ देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई बाजारामध्ये फिरत असते व तिला कोणत्याही प्रकारचा आजार नाही. माझी आई आजारी असल्याबाबत मी कोणतेही वैदयकिय कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आता मला दाखविलेल्या फोटोमध्ये माझे घर दिसत आहे व त्याच्या बाजुला शौचालय बांधलेले आहे.

२७. हे मला सांगता येणार नाही की माझे भावाचे घर श्री स्वामी समर्थ नगरमध्ये आहे व आता दाखविलेल्या फोटो त्या घराचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शौचालयाचे बांधकाम करतांना नगरपालीकेची तसेच घर मालकाची परवानगी घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, परवानगी घेतल्याबाबतची कागदपत्रे मी अभिलेखावर दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घर मालकाची परवानगी घेतल्याशिवाय मी दावा मिळकतीमध्ये बांधकाम करत होतो त्यामुळे घर मालकाने मला थांबविले होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये पोट भाडेकरी ठेवण्याच्या इरादयाने मी तेथे शौचालयाचे बांधकाम सुरु केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीशी कोणत्याही कारणावरुन

नेहमीच भांडत असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी इतर भाडेकरुन वादीच्या विरुध्द भडकवत असतो. हे म्हणणे खरे नाही की, वादीला त्रास देण्याकरीता मी नेहमीच प्रयत्न करत असतो. हे म्हणणे खरे आहे की, इगतपुरी नगरपालीकेमध्ये माझी ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे माझे समाजबांधव कामाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा गैरफायदा घेवुन मी वादीला त्रास होईल असे कृत्य करत असतो. हे म्हणणे खरे नाही की, वादीला वारंवार नोटीसा पाठवत असतो.

२८. हे म्हणणे खरे नाही की, सर्व भाडेकरु करीता वादीने दावा मिळकती जवळ शौचालय बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वेगळे शौचालय बांधण्याची मला कोणतीही आवश्यकता नाही. हे मला माहित नाही की वादीचे शिक्षण दहावीपर्यन्त झालेले आहे. हे मला माहित नाही की, दावा मिळकतीमधील माझे बांधकाम परवानगीचा अर्ज इगतपुरी नगरपालीकेने नामंजूर केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पुरावा दाखल केला आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/—

स्थळः—इगतपुरी ( मो. द. ननवरे )

दिनांक ०१.११.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, इगतपुरी,